**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ११०६/२०२३ मधील</u>**
**<u>अर्ज (निशाणी क्रमांक ५) वरील आदेश</u>**
(सीएनआर क्र.एमएचएएच०८-००२३७७-२०२३)

०१. वादीने प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १, २ प्रमाणे दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केला आहे. वादीचे म्हणणे असे आहे की, दावा मिळकत वादी व प्रतिवादी क्र.७ व ८ यांच्या वडिलोपार्जित मालकी वहिवाटीची आहे. त्याप्रमाणे त्यांच्या नावाची नोंद मालक व कब्जेदार म्हणुन फेरफार क्र.२६३३ ने करण्यात आलेली आहे. प्रतिवादी क्र.१ ते ६ यांचा दावा मिळकतीशी काहीही हक्क संबंध नाही. प्रतिवादींची जमिन दावा मिळकतीच्या उत्तर बाजुने लागुन देखील नाही. वादी दावा मिळकतीमध्ये नगदी पिके घेत आहे. वादीची प्रगती पहावत नसल्यामुळे प्रतिवादी क्र.१ ते ६ दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. वादीने त्यांना दि. ०२.१०.२०२१ रोजी वकिलांमार्फत नोटीस पाठविली व मोजणी करण्याबाबत कळविले. मात्र प्रतिवादींनी त्यास दाद दिली नाही. वादीला त्यांनी शिवीगाळ व दमदाटी करण्यास सुरूवात केली म्हणुन वादीने दि.१२.०१.२०२३ रोजी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. प्रतिवादी हे आडदांड स्वरूपाचे असुन न्यायालयाच्या हस्तक्षेत्राशिवाय प्रतिवादींचे बेकायदेशिर कृत्य थांबणारे नाही. त्यांनी दावा मिळकतीमध्ये असणारा पुर्व पश्चिम बांध अतिक्रमण करून फोडण्यास सुरूवात केली आहे. त्याबाबत त्यांना समजावुन सांगितले असता प्रतिवादी ऐकण्याच्या मनस्थितीत नाहीत. ते दावा मिळकतीची मोजणी करण्यास तयार नाहीत. प्रतिवादींच्या कृत्यामुळे वादीच्या न्याय्य हक्कास बाधा येणार आहे. त्यामुळे वादीस प्रस्तुत दावा दाखल करावा लागला. दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत प्रतिवादी क्र.१ ते ६ यांच्याविरूद्ध तुर्तातुर्त मनाई हुकम देणे आवश्यक आहे अन्यथा वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. या कारणांनी अर्ज मंजुर करण्याची विनंती वादीने केलेली आहे.

०२. प्रतिवादींनी सदर अर्जास तसेच दाव्यास म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे त्यांच्याविरूद्ध कैफियतीशिवाय प्रकरण चालविण्याचा आदेश करण्यात आला.

०३. सदर अर्जाच्या निर्णयासाठी उपस्थित झालेले मुद्दे त्यावरील निष्कर्षांसह खालीलप्रमाणे नमुद केले आहेत :-

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| ०१. सकृत दर्शनी दावा वादीचे बाजुने आहे, असे वादी सिद्ध करतात काय ? | .. होय. |

०२. न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे काय ? .. होय.

०३. विनंती प्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकुम न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? .. होय.

०४. काय आदेश ? .. अर्ज मंजुर करण्यात येतो.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ ते ४ बाबत** :-

०४. वादीतर्फे विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादींतर्फे कोणीही हजर नाहीत. वादीचे म्हणणे असे आहे की, दावा मिळकत त्यांच्या मालकी व कब्जे वहिवाटीची आहे. त्याप्रमाणे महसुल अभिलेखास नोंदी आहेत. प्रतिवादी बेकायदेशिररित्या त्यांच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करत आहेत. त्यामुळे अर्ज मंजुर करण्याची विनंती त्यांनी केलेली आहे. वादीने आपल्या म्हणण्याच्या पृष्ठयर्थ यादी नि.क्र.३ सोबत अ.क्र.१ वर दावा मिळकतीचा ७/१२ उतारा दाखल केलेला आहे. त्यावरून असे दिसते की, दावा मिळकतीस मालक व कब्जेदार म्हणुन वादी व प्रतिवादी क्र.७ व ८ यांच्या नावाची नोंद आहे. वादीने अ.क्र. ६ लगत फेरफार क्र.२६३३ ची छायांकित प्रत दाखल केलेली आहे. त्यावरून असे दिसते की, वादीचे वडिल मयत झाल्यानंतर वादी व प्रतिवादी क्र.७ व ८ सह इतर वारसांच्या नोंदी दावा मिळकत व इतर जमिनींना सदर फेरफाराने झालेल्या आहेत.

०५. वादीने नि.क्र.३/२ लगत दि.०२.१०.२०२१ रोजी प्रतिवादी क्र.१ ते ६ यांना पाठविलेली नोटीस दाखल केलेली आहे. तसेच अ.क्र.३/३ वर प्रतिवादींचे त्या नोटीसला आलेल्या उत्तराची प्रत दाखल केलेली आहे. त्यावरून असे दिसते की, गट क्र.८५९ क्षेत्र १ हे म्हणजेच दावा मिळकत वादीच्या मालकीची असल्याचे प्रतिवादींनी मान्य केलेले आहे. अशा प्रकारे दाखल कागदोपत्री पुराव्यावरून दावा मिळकत आपल्या मालकी व कब्जे वहिवाटीची असल्याचे वादीने प्रथम दर्शनी सिद्ध केले असल्याचे दिसते. ज्याअर्थी प्रतिवादींनी दावा मिळकतीची मालकी वादीची असल्याचे मान्य केलेले आहे त्याअर्थी सदर जागेवरील कब्जा देखील त्यांना मान्य असल्याचे गृहित धरावे लागेल. कारण सदर जमिन आपल्या कब्जे वहिवाटीत असल्याचे प्रतिवादींचे म्हणणे नाही अथवा तसे दर्शविणारा कोणताही पुरावा त्यांनी दाखल केलेला नाही.

०६. प्रतिवादींनी केलेल्या कथीत हरकतीबाबत वादीने पोलिस ठाण्यात तक्रार दिल्याचा उल्लेख दाव्यामध्ये केलेला आहे. त्या अनुषंगाने दि.१२.०१.२०२३ रोजी संगमनेर तालुका पोलिस ठाण्यात वादीने प्रतिवादी क्र.१, ३, ४, ६ यांच्याविरुद्ध दाखल केलेल्या फिर्यादीची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. त्यावरून असे प्रथम दर्शनी दिसते की, दि. ०९.०१.२०२३ रोजी सकाळी ९.०० वाजता वादीच्या कब्जे वहिवाटीस सदर प्रतिवादींनी कथीतरित्या हरकत घेतली. प्रतिवादींनी वादीतर्फे दाखल करण्यात आलेल्या कोणत्याही पुराव्यास खोडुन काढणारा पुरावा दिलेला नाही अथवा कैफियत, म्हणणे दाखल करून वादीचे म्हणणे नाकारलेले नाही. त्यामुळे या घडीस वादीच्या म्हणण्यामध्ये तथ्य आहे व त्याबाबत प्रतिवादींची काहीही हरकत नसल्याचे म्हणावे लागेल. अशा प्रकारे, प्रथम दर्शनी दावा आपल्या बाजुने असल्याचे वादीने सिद्ध केलेले आहे. दावा मिळकतीवरील वादीच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करण्याचा प्रतिवादी क्र.१ ते ६ यांना कोणताही अधिकार नाही. प्रतिवादी क्र.१ ते ६ यांना त्यांच्या कृत्यापासुन न रोखल्यास वादीचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता आहे. अशा प्रकारे न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे. सबब, अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे मुद्दा क्रमांक १ ते ३ यांचे उत्तर होकारार्थी देण्यात येत असुन मुद्दा क्र.४ च्या उत्तराकरीता खालील प्रमाणे आदेश करण्यात येत आहे :-

## <u>आदेश</u>

०१. अर्ज (नि.क्र.५) खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

०२. प्रतिवादी अथवा त्यांच्यातर्फे इतर कोणीही दावा मिळकतीवरील वादीच्या कब्जे वहिवाटीस दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत हरकत अडथळा करू नये अशी ताकीद त्यांना देण्यात येत आहे.

MANSOOR MAHAMOOD SHAIKH
Digitally signed by MANSOOR MAHAMOOD SHAIKH
Date: 2024.03.02 16:23:38 +0530

ठिकाण :- संगमनेर.
दिनांक :- ०२.०३.२०२४.

(एम. एम. शेख)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
संगमनेर.